दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र • रविवार दि.१७ नोव्हेंबर २०२४ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक -८६ • पाने ४ • किंमत ४ रुपये


### धर्म आणि जातीवर निवडणुका लढवणे हे नामर्दाचे लक्षण

**मुंबई**–विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात परिवर्तन आघाडीने देखील आपले उमेदवार उतरवले आहेत. आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेकडून धनंजय गावडे यांना नालासोपारा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या प्रचारार्थ बच्चू कडू यांनी विरार येथे सभा घेतली होती. यावेळी त्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. जाती धर्माच्या नावावर निवडणूक लढवणे हे नामर्दाचे लक्षण असल्याची टीका बच्चू कडू यांनी केली आहे.विरारच्या सभेत बोलताना बच्चू कडू यांनी वसई विरार येथील स्थानिक आमदारावर तसेच सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, देशाच्या आर्थिक राजधानीच्या बाजूला असलेल्या या भागात अद्याप पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. हे दुर्दैव आहे. नालासोपारा विधानसभा निवडणुकीसाठी विद्यमान आमदार क्षितिज ठाकूर गटासाठी इतर उमेदवार मॅनेज केले गेले आहेत. ते एक्का-दुकी आहेत, त्यांनी प्रहारचा उमेदवार धनंजय गावडे याला खरी लढत देणारा उमेदवार म्हणले आहे, असे बच्चू कडू म्हणाले.पुढे बोलताना बच्चू कडू यांनी भाजपवर टीका केली आहे.

## देवेंद्र फडणवीसांच्या सभेत पावसाची हजेरी

# पावसात सभा झाल्यावर निवडून येतात,असे नेते म्हणतात; फडणवीसांचा पवारांना टोला

**शिरोळ (वृत्तसंस्था)**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज शिरोळ येथे सभा पार पडली. सभा सुरू असतानाच पावसाने हजेरी लावली. देवेंद्र फडणवीस यांनी पावसात भिजत भाषण केले. पावसात भिजलो की जागा निवडून येते, असे नेते म्हणतात, असा टोला फडणवीसांनी शरद पवारांना लगावला. आता मतांचा पाऊस पडणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असे म्हणत शिरोळ मतदारसंघासाठी पैशांची कमतरता पडू देणार नाही, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.शिरोळसाठी सगळ्या मागण्या पूर्ण करून दाखवू. पाच वर्षांनी पुन्हा मते येऊ तेव्हा त्यातील एकही मागणी शिल्लक नसेल हे वचन देण्यासाठी मी आलो आहे. आमचे सरकार सामान्य माणसाचे सरकार आहे, असे फडणवीस म्हणालेत.१५ वर्षे ऊसाचा कारखाना आणि शेतकऱ्यावर इनकम टॅक्सची तलवार लटकली होती. शेतकऱ्यांवर इनकम टॅक्सची तलवार लावू नका अशी मागणी घेऊन पवार साहेब मनमोहन सिंग यांच्याकडे गेले होते, पण हात हालवत परत यायचे. आमचे सरकार आल्यानंतर एका झटक्यात शेतकऱ्यांवरील १० हजार कोटींचा इनकम टॅक्स मोदी आणि अमित शहांनी रद्द केला, असा दावाही फडणवीस यांनी केला.



### पावसात सभा झाली की निवडून येतात

**सत्यजित देशमुख यांची सीट निवडून येणे पक्के आहे. कारण मी पावसात सभा घेतोय. पावसात सभा घेतली की, सीटा निवडून येतात. हा शुभ् संकेत आहे. पावसात सभा झाल्या की, निवडून येतात, असे नेत्यांचे म्हणणे आहे, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांना टोला लगावला. पुढे ते म्हणाले, पाऊस पडो अथवा ना पडो पण मतांचा पाऊस पडणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.**

### वाकुर्डीच्या योजनेला निधी कमी पडू देणार नाही

**वाकुर्डी बुद्रुकची योजना १९९९ ते २०१४ कुलूपबंद होती. जयंतराव पाटील अर्थमंत्री, जलसंपदा मंत्री होते, पण फुटकी कौडी दिली नाही. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर एका झटक्यात १०० कोटी रुपये दिले. या योजनेच्या निमित्तोन महाराष्ट्राचा निर्णय घेतला. आता ओपन कॅनॉल नाही तर बंदीस्त पाईपच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाणी जाईल, असे मी सांगितले. पहिला टप्पा संपत आहे, दुसरा टप्पाही आता मंजूर आहे. सत्यजित देशमुख निवडून आल्यास, वाकुर्डीचे सगळे टप्पे पूर्ण होईपर्यंत पैशांची कमतरता पडू देणार नाही, हा माझा शब्द आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले. ४५ हजार एकर जमीन आपल्याला पाण्याखाली आणायची आहे. या २६ योजना करण्याचे पूर्ण करण्याचे वचन देवाभाऊ तुम्हाला देतोय, असेही ते म्हणालेत. महायुतीचे सरकार आल्यानंतर मार्चच्या बजेटमध्ये बार उडवून देतो आणि या सगळ्या योजनांचे काम करतो, असे आश्वासनही त्यांनी दिले.**

## शालेय विद्यार्थ्यांसाठी' अपार' कसा तयार करावा?

### शिक्षण उपसंचालकांनी शाळांना दिल्या सूचना

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

विभागातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची माहिती यु-डायस पोर्टलवर आधार प्रमाणीकरण करुन अपार आयडी तयार करण्याबाबत शिक्षण उपसंचालकांनी सूचना दिल्या आहेत. तसेच यु-डायस पोर्टल काय आहे? त्यामध्ये अपार आयडी कसा तयार करावा? आणि ते कसे हाताळायचे? याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

यू डायस प्लस प्रणालीमधून पूर्व प्राथमिक तसेच पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचे 'अपार आयडी' येत्या २० नोव्हेंबरपर्यंत

उपलब्ध करून देण्यात यावेत, अशा सूचना शिक्षण उपसंचालकांनी सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

त्यामुळे आवश्यक प्रशिक्षण घेऊन सर्व मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांपर्यंत 'अपार आयडी' पोचविण्याचे काम करावे लागणार आहे. केंद्राकडून देशातील प्रत्येक विद्यार्थ्यांला अपार आयडी उपलब्ध करून देण्याचा राष्ट्रीय उपक्रम सुरू केला आहे. त्यानुसार पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना ते देण्यात येणार आहे. केंद्रीय शिक्षण विभागाने देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला अपार आयडी उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले होते.

**शाळांनी हे करावे**

विद्यार्थ्यांचा अपार आयडी तयार करण्यासाठी पालक शिक्षक सभा आयोजित करावी

शाळांनी पालकांना संमतीपत्रे देवून ती भरुन घेणे आवश्यक आहे.

अल्पवयीन विद्यार्थ्यांसाठी पालकांनी संमत्तीपत्र भरुन देणे आवश्यक

विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना अपारचे संपूर्ण स्वरुप महत्त्व समजून सांगावे.

कामाचा दररोज घ्यावा आढावा


**मुख्याध्यापकांना प्रशिक्षण गट स्तरावर प्रशिक्षण देण्यात यावे**

दररोज आढावा घेण्यात यावा.

त्या संदर्भातील माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयास पाठवावी.

आयडी दिल्यानंतर मुख्याध्यापकांना तो ओळखपत्रावर प्रिंट करण्यासाठी कळवावे.

## केज शहरात पोलीस आणि सीमा सुरक्षा दलाचे पथसंचलन



**केज । गौतम बचुटे**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केज शहारामध्ये सीमा सुरक्षा दल आणि पोलिसांनी पथसंचलन केले

दि. १६ नोव्हेंबर रोजी केज पोलिसांनी २० नोव्हेंबर रोजी होत असलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन आणि सीमा सुरक्षा दलाचे अधिकारी परासराम सिंग यांच्या नेतृत्वात शहरातील प्रमुख मार्गा वरून शस्त्रासह पथ संचलन केले. यात पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस उपनिरिक्षक राजाभाऊ लंगडे यांच्यासह सर्व पोलीस अधिकारी, गृहरक्षक दलाचे जवान आणि कर्मचारी सहभागी झाले होते. या पथ संचलनात पोलीस, सीमा सुरक्षा दल आणि गृह रक्षक दलाचे ४ अधिकारी आणि १४४ जवान सहभागी झाले होते. सुरक्षा दलाच्या शस्त्र संचलनामुळे निवडणुकीच्या दरम्यान गडबड गोंधळ करणाऱ्या असामाजिक तत्व यांच्या विरुद्ध कठोर कारवाही करण्याचे देखील संकेत या पथ संचलनातून दिले आहेत.

## लोहा येथे मतदान जन-जागृती व मानवी साखळी




**लोहा । किरण दाढेल**

लोहा विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणूक स्वीप मतदान जनजागृती यादी व मानवी साखळी काढण्यात आली. मतदान जनजागृती रॅलीचे उद्घाटन निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी केले.यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठलराव परळीकर ,रामेश्वर गोरे, नायब तहसीलदार रेखा चामनक,नोडल अधिकारी स्विप कक्ष सतीश व्यवहारे ,संजय येरमे , शिक्षण विस्तार अधिकारी बी.पी.गुट्टे ,सरस्वती आंबलवाड ,अंजली कापसे, बाबुराव फसमले ,केंद्रप्रमुख डी आर शिंदे, जी.एस .मंगनाळे, संतोष जोशी, सुभाष पानपट्टे, मुख्याध्यापक हेमंत कवर , पी.डी.पोले ,सूर्यकांत लुंगारे, बापूराव राठोड, हनमंत पवार , गटसाधन केंद्र सिद्धार्थ सोनकांबळे, बाळू चव्हाण, संजय अकोले ,आर वाय चव्हाण, संत गाडगे महाराज महाविद्यालय एनसीसी प्रमुख बी आर ठाकूर उपस्थित होते.मतदान जनजागृती रॅली एसटी बसस्थानक लोहा येथे आल्यानंतर बसस्थानकात मानवी साखळी करून मतदान जनजागृती घोषणा स्विप वाहनाद्वारे, जनजागृती नवनाथ बोळकेकर, शिवसांब गणाचार्य ,बालाजी जंगापुरे, शांता एंगडे, अर्चना वावधाने यांनी केले. यावेळी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व संत गाडगे महाराज महाविद्यालयाचे एनसीसी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरणातील सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर यांचा प्रीतम म्हात्रे यांना जाहीर पाठींबा

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरणचे पहिले आमदार भाऊसाहेब डाऊर यांच्या कडून राजकारणाची आणी समाजकारणाची शिदोरी घेऊन चाणजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच,तथा उरण पंचायत समितीचे माजी सभापती व रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिवंगत रमेश डाऊर यांच्या कडुन राजकारणाचा व समाज कारणाचा वसा घेत करंजा गावाचे सुपुत्र सचिन रमेश डाऊर हे आजपर्यंत राजकरणा पासून अलिप्त असले तरी समाजकरणाची कास त्यांनी कधीच सोडली नव्हती, आपल्या आजोबांच्या आणि वडिलांच्या समाजकारणाचा वसा त्यांनी तंतोतंत जपला आहे.आजोबांची पुण्यथिती असो वा वडिलांचा स्मृतिदिन असो.किंबहुना स्वतःचा वाढ दिवस असो या दिवशी नियमितपणे गोरगरिबांना अन्न वस्त्र देऊन त्यांनी तो साजरा केला आहे,थंडीच्या मोसमात कातकरवाडीवर जाऊन मायेची उबदार घोंगडी या गोर गरिबांच्या अंगावर घातली आहे.करोनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेले कार्य केवळ कौतुकास पात्र असून त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून कोरोनाग्रस्थाना केलेली वैद्यकीय






मदत, अन्नधान्याची मदतही त्यांच्या त्या काळांतील अतुलनीय सेवेची मानद पावती आहे.करंजा पाणी प्रश्न,रस्त्यांचा प्रश्न,कचऱ्याचा प्रश्न असो अथवा द्रोणागिरी डोंगराच्या माती उत्खनाचा जटील प्रश्न असो,या सर्व सामाजिकदृष्ट्या महत्वप्राप्त प्रश्नाना आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात समाज माध्यमांतून सडेतोड पणे लिखाण करून जनजागृतीसाठी अहोरात्र परिश्रम करणारे सचिन डाऊर हे तरुणाच्या गळयातले ताईत बनले आहेत.मोठया प्रमाणात तरुणवर्ग त्यांच्या बरोबर आहे.

त्यांना अनेक वेळा टीका ही सहन करावी लागली परंतु त्या टीकेला न जुमानता त्यांनी समाज माध्यमावर आपले विचार मांडण्याचे सोडले नाही.अनेक बड्याबड्या नेत्यांनी त्यांना राजकारणाकडे ओढण्याचा प्रयत्न केला अनेक मोठमोठ्या पदांचे आमिषही त्यांना दाखविले तरीही त्यांनी हा मोह टाळून वेट अँड वॉच ची भूमिका बजाविली होती. त्यांचे असे मत आहे की जोपर्यंत असा योग्य नेता सापडत नाही की जो या सामन्य जनतेच्या समस्या जाणून त्याचे निरसन करील.असे नेता ते बघत होते.त्यांना त्यांच्या या प्रश्नाचे उत्तर त्यांना येत्या २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत एक नव्यादमाचे तरुण तडफदार नेतृत्व प्रीतम जेएम म्हात्रे यांच्या रूपाने मिळाले आहे.

त्यामुळे आज पून्हा एकदा आपल्या आजोबांचा आणि वडिलांच्या राजकारणाची शाल अंगावर घेऊन उरण मधील तरुणाचे लाडके आणि आजही समाजमाध्यमावर हजारोच्या संख्येने असणारे त्यांचे चाहते, हे अस्त्र घेऊन सचिन डाऊर राजकारणाच्या आखाड्यात उतरले आहेत. आगामी उरण विधान सभा निवडणुकीत उरण मतदारसंघातील गावा गावातील मुलभूत समस्या रस्ते, पाणीटंचाई, स्वच्छता, आरोग्य तसेच बेरोजगारी, उरण मधील सुसज्ज १०० खाटांचे रुग्णालय, विद्यार्थ्यांना इंजीनियरिंग, मेडिकल कॉलेज तसेच उच्च शिक्षणा ची व्यवस्था उरण मध्ये नसल्यामुळे नवी मुंबई, मुंबई मध्ये जाण्यास किमान दोन तासाचा प्रवास करावा लागत आहे.उरण रेल्वे सुरु झाली तरी स्थानिकांना या रेल्वे प्रकल्पात नोकऱ्या मिळालेल्या नाहीत त्याच प्रमाणे आगामी काळात उरण मतदारसंघात उभारण्यात येत असलेल्या लोकनेते स्वर्गीय दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळावर असणाऱ्या नोकरीत स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांना समाविष्ट करण्याचा विषय, तसेच करंजा रेवस सागरीसेतू मध्ये नोकरीत आणि व्यावसायिक संधी या सर्व गोष्टींचा विचार करता हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे तरुण तडफदार उमेदवार त्यांचे मित्र प्रितम जेएम म्हात्रे यांना सचिन डाऊर यांनी जाहीर पाठींबा दिला आहे. आणि सर्व तरुणांनी आणि नागरिकांनी त्यांच्या पाठीशी राहून त्यांची निशाणी शिट्टीचा बुलंद आवाज उरणच्या विधानसभा मतदार संघामधून राज्याच्या विधानसभे पर्यंत पोचवा व त्यांना भरघोस मताने विजयी करा असे आवाहन सचिन डाऊर यांनी मतदारांना केले आह

## संपादकीय

# प्रसाद असावा सात्त्विक!



विविध धर्मीयांच्या प्रार्थनास्थळांमध्ये प्रसादातील नानाविध प्रकारच्या पदार्थांचा समावेश असतो. कोणत्या स्वरूपामध्ये भाविकांना प्रसाद देण्यात यावा, याला काही निश्चित निकष नाही. भाविकांसाठी मंदिरांसह प्रार्थनास्थळांमध्येही जेवणाचीही सुविधा असते. प्रसाद कशा स्वरूपामध्ये द्यावा, असे कोणतेही निश्चित निकष नाहीत. वातावरणातील बदल, भाविकांची वाढती गर्दी, मंदिराला मिळणारी आर्थिक मदत, दान याचाही परिणाम प्रसादाच्या स्वरूपावर होत असतो, याकडे जाणते लक्ष वेधतात. काही ठिकाणी मंदिरामध्ये, प्रार्थनास्थळी प्रसादाचे वितरण केले जाते, तर अनेक ठिकाणी प्रार्थनास्थळांच्या बाहेर भाविकांना प्रसाद दिला जातो. हा प्रसाद कधी देवाला द्यायच्या फुलानारळाच्या ताटामध्ये असतो, तर कधी भाविकांना घरी नेण्यासाठी वेगळा दिला जातो. या प्रसादाचीही गुणवत्ताचाचणी करणे गरजेचे आहे. मात्र ती केली जात नाही.

**वेगळा विचार नाही**

मंदिरातून देण्यात येणारा प्रसादाच्या गुणवत्तेचा तपासणीच्या निकषावर वेगळा विचार केला जात नाही. अन्नपदार्थ म्हणून त्याकडे पाहिले जाते. प्रसाद तयार करताना त्यामध्ये कोणते घटकपदार्थ वापरले जातात याची तपासणी होत असते. उदा. तूप, साखर, रवा, मैदा, बेसन यांसारख्या घटक पदार्थांची गुणवत्ता काय आहे, हे तपासून पाहिले जाते. घटक पदार्थांची गुणवत्ता तपासली म्हणजे तयार होणारी अंतिम पदार्थांची, प्रसादाची गुणवत्ता चांगलीच असेल, असा निश्चित अंदाज बांधला जातो. मात्र प्रक्रियेमध्ये पूर्णपणे तयार झालेल्या प्रसादाची गुणवत्ताही तपासायला हवी, असा आग्रह तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. हा प्रसाद कोणत्या ठिकाणी ठेवला जातो, त्याची साठवणूक कशी होते, साठवणुकीचा मुदत कालावधी किती आहे, त्या कालावधीमध्ये प्रसादाचे वितरण केले जाते का, याकडे अत्यंत गांभीर्याने पाहायला हवे. मुदतबाह्य प्रसाद आरोग्यासठी अपायकारक ठरू शकतो. प्रसाद तयार करताना साजूक तूप, दूध वा दर्जेदार दुग्धजन्य पदार्थांऐवजी निकृष्ट दर्जाच्या पदार्थांचा वापर करणे आरोग्यासाठी अपायकारक ठरू शकते. त्यामुळे एका ठोस व निश्चित नियमावलीची गरज प्रसादासाठी आहे, अशी मागणी आता पुढे येत आहे.

**अन्ननिरीक्षकांची नियुक्ती**

तिरुपती वादाच्या पार्श्वभूमीवर आता राज्यातील काही प्रार्थनास्थळांमध्ये अन्ननिरीक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. अन्नशास्त्रामध्ये प्रावीण्य असलेल्या सदस्यांची समिती स्थापन करणे, नियमित तपासणी करणे, प्रसाद तयार करण्यापासून ते त्याचे पॅकिंग करेपर्यंत सर्व सूचनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जाते का, हे अन्ननिरीक्षकांच्या माध्यमातून तपासण्यात येणार आहे. मंदिर तसेच प्रार्थनास्थळी येणाऱ्या भाविकांच्या आरोग्यासह त्यांच्या श्रद्धेचीही जपणूक यामुळे होणार आहे. महाप्रसाद तसेच कोरड्या प्रसादाची गुणवत्ता निश्चित करण्यासाठीही याची मदत होणार आहे. मंदिरामध्ये लावण्याच्या दिव्यांसाठी चांगल्या प्रतीचे तेल व तूप वापरले जाते का, याची खातरजमा करण्यासाठीही अन्ननिरीक्षकांची मदत होणार आहे.

**भोग उपक्रमाची मदत**

प्रार्थनास्थळांमार्फत वितरण केल्या जाणाऱ्या या प्रसादाचा दर्जा सुधारावा आणि त्याची गुणवत्ता कायम राहावी, यासाठी अन्न व प्रशासनाने 'भोग' हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत या प्रार्थनास्थळांवरील प्रसादाची गुणवत्ता तपासणे, त्याठिकाणी वापरण्यात येणाऱ्या पाणी, प्रसादासाठी वापरण्यात येणाऱ्या घटक पदार्थांची तपासणी करणे तसेच प्रसाद आणि इतर पदार्थ तयार करताना स्वच्छतेच्या निकषांचे पालन होते का, याचीही तपासणी होणार आहे. प्रसाद तयार झाल्यानंतर वैद्यकीय पद्धतीनेही त्याची तपासणी करण्यात येणार आहे. सध्या राज्यातील २४ प्रार्थनास्थळांमध्ये 'भोग' उपक्रमाअंतर्गत प्रसाद प्रमाणित करण्यात येणार आहे.

**प्रयोगशाळांची व्याप्ती वाढवण्याची गरज**

अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळांवर अन्न आणि औषधांच्या चाचण्या करण्यासंदर्भात असलेला ताण दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक ठिकाणचे अन्न तसेच औषधांचे नमुने चाचणीअभावी प्रलंबित आहेत. तज्ज्ञ कुशल मनुष्यबळाचा अभाव यामुळे या प्रसादाची गुणवत्ता चाचणी करण्याचे अतिरिक्त काम कसे घ्यायचे, हा प्रश्न प्रशासनातील तज्ज्ञांनी उपस्थित केला. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने निश्चित नियमावली व निकषांसाठी मार्गदर्शन करावे व त्याची अंमलबजावणी देशात एकाच पद्धतीने होते का, हे तपासावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# वित्ताचे तंत्रज्ञान, तंत्रज्ञानातील वित्त

'मूळ माहिती', 'संकलित माहिती', 'नोंदवलेली माहिती' असे काळानुरूप माहितीचे प्रकार पडले आहेत. या माहितीचा 'केवळ संकलित माहिती' अर्थात डेटा हा एक प्रकार. हा प्रकार विद्यार्जन, तंत्रार्जन आणि अर्थार्जन यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. डेटा ही आजच्या जगातली सर्वात मौल्यवान मत्ता (असेट) आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. आपल्या देशात झालेल्या डिजिटल पेमेंट क्रांतीचा फार मोठा आधार हा डेटा आहे. या डेटाला योग्य पद्धतीने मार्गस्थ करण्याचं, त्याच्या संरक्षणासाठी सज्ज राहण्याचं आणि त्याच्या साह्याने आपलं जीवन सुकर करण्याचं तंत्रज्ञान आज आपण स्वतः तयार करत आहोत. या तंत्रज्ञानाचा वापर आपण 'डिजिटल पेमेंट' हा दोन अक्षरी मंत्र सिद्ध करण्यासाठी करतोय. हे तंत्रज्ञान म्हणजेच वित्त-तंत्रज्ञान अर्थात 'फिनटेक' होय. देशात फिनटेकला यंदा दोन दशकं पूर्ण होत आहेत. जगात फिनटेक क्षेत्रात समर्थपणे वावरणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक तिसरा आहे. फिनटेकमध्ये आपल्या देशात नऊ हजार कंपन्या कार्यरत असून या क्षेत्रात छोट्या-मोठ्या कंपन्यांनी ५८.२० अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. आपल्याला गरीब राष्ट्र, तिसऱ्या जगातलं राष्ट्र असं आजही हिणवणाऱ्या देशांना आपल्या फिनटेक प्रगतीनं आपण तोंडात बोटं घालायला लावलं आहे. देशातली स्थिती पाहिली तर लक्षात येईल, की आपण फिनटेकचा स्वीकार जगातील फिनटेक स्वीकाराच्या तुलनेत ८७ टक्के केला आहे. दोन व्यवसायांमधले व्यवहार (बीटूबी), दोन व्यवसाय व ग्राहक यांच्यातले व्यवहार (बीटूबीटूसी), दोन ग्राहकांमधले व्यवहार (सीटूसी) अशा अनेक आघाड्यांवर आपण आज फिनटेक वापरत आहोत.

**करोनाची इष्टापत्ती**

इंग्रजीमध्ये लश्रर्शीीळपस ळप वळीसीीळीश असा वाकप्रचार आहे. करोनाचा संसर्ग आणि त्यातून करावे लागलेलं लॉकडाउन हे भारतीय फिनटेकसाठी लश्रर्शीीळपस ळप वळीसीीळीश ठरलं. घरातून बाहेर पडताच येत नाही आणि नित्य गरजेच्या वस्तूंचा पुरवठा होणं तर गरजेचं आहे, अशा विचित्र परिस्थितीत काहीशा नाईलाजाने आपण मोबाइलच्या साह्याने पेमेंट पद्धत स्वीकारली. त्यावेळी पेमेंट क्षेत्रात आपण काहीतरी भव्यदिव्य करत आहोत याची कल्पना ही सेवा तयार करणाऱ्यांना आणि तिचे वापरकर्ते आपण यांना कदाचित आली नसावी. यथावकाश मात्र त्यावाचून आपलं सगळीकडे अडायला लागलं. फिनटेकचा स्वीकार हा असा नाईलाजाने का होईना केला गेला आणि आज तो आपल्या जीवनाचं अविभाज्य अंग बनलाय. युनिफाइड पेमेंट इंटरफेस किंवा यूपीआय आठ वर्षांपूर्वी अस्तित्वात आलं. त्याची भरभराट करोना काळात झाली असं म्हणावं लागेल.

**फिनटेकचा 'दादा' देश**



नुकतीच ग्लोबल फिनटेक फेस्ट ही तीन दिवसांची जागतिक परिषद मुंबईत झाली. या परिषदेत ८०० ते एक हजार कंपन्यांनी दालनं उभारली होती, ज्यातून फिनटेकचं दिमाखदार प्रदर्शन मांडलं गेलं. यामुळे फिनटेक क्षेत्रात आपला प्रभाव दिसून आला. कंपन्यांबरोबरच फिनटेक धोरणकर्ते, नेते, स्टार्टअप, कल्पक उद्योजक यांचाही यात सहभाग होता. जागतिक परिप्रेक्ष्यातून या घटनेकडे पाहिल्यास भारताचं वर्चस्व या क्षेत्रात निर्माण झालंय हे अधोरेखित झालं.युरोप आणि अमेरिका हे प्रदेश आर्थिक देवाणघेवाणीच्या बाबतीत अजूनही धनादेशासारख्या पारंपरिक साधनांना चिकटून आहेत. भारतातला यूपीआयचा उदय, स्वीकार, प्रसार आणि त्याची उपयोगिता (जी काळाच्या कसोटीवर उतरली आहे.) ही स्पष्ट दिसू लागल्यावर आता युरोप आणि अमेरिका या प्रदेशांकडून 'यूपीआय आम्हालाही द्या' अशी मागणी होऊ लागली आहे. डिसेंबर २०१९मध्ये अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या यूएस फेडरल रिझर्व्हच्या संचालक मंडळाला गुगल कंपनीने सल्लाच दिला, की यूपीआयची कार्यपद्धती समजावून घ्या आणि तसं काहीतरी अमेरिकेत देखील आणा! २०११मध्ये आपल्या देशात सर्वसामान्य नागरिकांकडून रोकडविना अदायगीचे (नॉन कॅश पेमेंट) केवळ सहाच व्यवहार झाले, पण त्याच वर्षात किरकोळ दुकानांतून कार्डाने पेमेंटचे एक कोटी व्यवहार झाले. लोक रोकड टाळून कार्डाकडे वळत आहेत हे एक तर रिझर्व्ह बँकेच्या लक्षात आलं आणि लक्षात आलं सायबर चोरांच्या! डेबिट असो की क्रेडिट, कोणत्याही कार्डाचं क्लोनिंग करता येतं हे उघड झालं आणि मग मात्र विनाकार्ड पेमेंट व्यवहार आवश्यक वाटू लागले. या गरजेतून विनारोकड पेमेंटसाठी एक स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध होणं आणि ती सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होणं, त्यातही ती नागरिकांच्या मोबाइलमध्ये उपलब्ध होणं ही काळाची गरज बनली. या सगळ्या विचारमंथनातून २००९मध्ये स्थापन झालेल्या नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशनने (एनपीसीआय) यूपीआय विकसित केलं. यूपीआय सुपर-डुपर हीट झालंय.

**भारतीय फिनटेकची वैशिष्ट्ये**

आपलं फिनटेक हे सर्वसमावेशक आहे. या फिनटेकचा मुख्य आधार यूपीआय हा आहे. यूपीआय हा विनारोकड पेमेंटसाठी एक मंच आहे आणि या मंचावर अनेक प्रणाली सहजगत्या लाँच करता येतात. उपयुक्त फिनटेक बाजारात आणल्यास केंद्र सरकारही मदत करण्यासाठी उत्सुक आहे. अद्यापही बँक शाखेत प्रत्यक्ष न जाता घरबसल्या मोबाइलवरून आर्थिक व्यवहार करण्यासाठी लोक घाबरताना दिसतात. विशेषतः ग्रामीण भागात स्त्रियांना ही भीती जाणवत असते. फिनटेक देशात आणखी यशस्वी करायचं असेल तर समाजाच्या सर्व स्तरांमध्ये याविषयी पुरेशी जागृती करणं गरजेचं आहे. एकंदर डिजिटल इकोसिस्टिमबाबत लोकांच्या मनात असलेली शंका लवकरात लवकर फिटणे गरजेचे आहे. वापरकर्त्यांच्या भाषेत बोलणाऱ्या आणि वापरण्यास अत्यंत सोप्या अशा सुविधा तसंच अशी अप हे आपल्या फिनटेकचं सर्वात मोठं वैशिष्ट्य आहे.

**फिनटेकसमोरील आव्हाने**

पुढचं दशक हे फिनटेकसाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. अर्थात हे वाक्य दरवर्षी म्हटलं तर हे दशकही एकेक वर्षानं पुढे जाईल. त्यामुळे २०२४ पासून २०३५पर्यंतचा काळ भारतीय फिनटेकसाठी फार महत्त्वाचा आहे, असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. या काळात भारतीय फिनटेकसमोरील आव्हानांचा विचार केला तर काही ठळक आव्हाने दिसतात -

१. स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पेमेंट व्यवहार करताना ते विविध देशांच्या पेमेंट पद्धतींना सामावून घेणारे असे करणे हे मोठं आव्हान आहे. सध्या ज्याला आपण क्रॉस बॉर्डर म्हणतो, तसे व्यवहार करताना अडचणी येत आहेत. यूपीआय हा जर सर्व डिजिटल व्यवहारांचा आधार मानला, तर हे यूपीआय आपल्या देशात वापरू देण्यासाठी अजून अनेक देश तयार नाहीत. काही ठिकाणी राजकीय आडमुठेपणा तर काही ठिकाणी तंत्रज्ञानाची अपूर्णता अशी कारणं आहेत.

२. देशात तयार होणाऱ्या फिनटेकला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याचं मोठं आव्हान आपल्या कंपन्यांसमोर आहे.

३. तंत्रज्ञानाची निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता आहे.

४. कोणतंही फिनटेक वापरता त्या तंत्रज्ञानाने देशातील सर्व माहिती तंत्रज्ञानविषयक कायद्यांचे पालन केलेलं असणे आवश्यक आहे. तसंच हे तंत्रज्ञान वापरणाऱ्याला यापासून किती जोखीम घ्यावी लागेल तेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.

५. फिनटेक पर्यावरणानुकूल असणं महत्त्वाचं आहे.

६. आर्थिक घोटाळे आणि सायबर फसवणूक ही दोन मोठी आव्हाने आज फिनटेक कंपन्यांसमोर उभी आहेत.

**काही महत्त्वाची पावले**

१. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आर्थिक सेवा यांची एकमेकांशी सांगड घालण्यात आली आहे. त्यामुळे आता वित्तसंस्थांना बॉट, चॅटबॉट यांच्या माध्यमातून ग्राहकाशी थेट संवाद साधणं शक्य होत आहे. यामुळे डिजिटल व्यवहाराची सुरक्षितता वाढली आहे.

२. रिझर्व्ह बँकेकडून सेंट्रल बँक डिजिटल करन्सी अर्थात ई-रुपयाचा वापर नागरिकांसाठी अधिक सुलभ करण्यात आला आहे. ई-रुपया ग्राहकांना देण्यासाठी एचडीएफसी बँक, कॅनरा बँक अशा काही प्रमुख बँकांना परवानगी देण्यात आली आहे. यामुळे रोकड प्रत्यक्ष बाळगण्याची जोखीम संपली आहे.


३. कार्डविरहित एटीएमला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिलं जात आहे. त्याचप्रमाणे कार्डविरहित व्यवहारांनाही चालना दिली गेली आहे.

४. बीटूबी व्यवहारासाठी भारत बिलपे ही सुविधा एनपीसीआयने आणली आहे. वापरकर्त्यांना स्वतः सर्व प्रकारची पेमेंट आपसात थेट करता यावीत यासाठी यूपीआय सर्कल ही सुविधा एनपीसीआयने बाजारात दाखल केली आहे.

फिनटेक ही काळाची गरज तर आहेच, शिवाय हे तंत्रज्ञान आता आपल्या दैनंदिन व्यवहारांचा कणा ठरलं आहे. हे तंत्रज्ञान नवं असलं आणि म्हणून ते लोभस असलं तरी ते जबाबदारीनं हाताळण्याची गरज आहे. म्हणून फिनटेकची कोणतीही सुविधा स्वीकारताना त्याविषयी पुरेशी माहिती घेणं महत्त्वाचं आहे. अशी माहिती घेताना स्वतःच्या माहितीचा कुठेही कोणाकडून दुरूपयोग केला जाणार नाही याचीही खात्री बाळगणं महत्त्वाचं आहे. अशी सर्व खबरदारी बाळगल्यास येणारं दशक हे भारतीय फिनटेकचंच असेल याच काही शंका नाही.

# जग भारताविषयी आशावादी का आहे?

जग सध्या अनेक भूराजकीय पेचप्रसंगात अडकलेलं आहे आणि महागाईच्या आगीतून बाहेर पडता पडता मंदीच्या फुफाट्यात फेकलं जातंय की काय, याची चर्चा सुरू आहे. पण अशा वेळी सर्वच देश आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था भारताच्या आर्थिक प्रगतीची प्रशंसा करताना दिसत आहेत. जेपी मॉर्गन या अमेरिकेतील सर्वात मोठ्या वित्तसंस्थेचे जागतिक अध्यक्ष जेमी डिमॉन यांनी अलीकडेच त्यांच्या भारतभेटीत भाकीत केलं की या दशकाअखेर भारत सात ट्रिलियन डॉलरची उंची गाठू शकेल, तर त्यांचे कार्यकारी संचालक जेम्स सलिव्हन यांनी भारतात १०० बिलियन डॉलरच्या नवीन गुंतवणुका येऊ घातल्या असल्याचं विधान केलं. जेपी मॉर्गन जगातील ८५० मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भारतातील व्यवहार सांभाळते आणि साहजिकच विदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदार यांचा भारताकडे वळणारा कल त्यांना सगळ्यात आधी जाणवणार हे खरं. मात्र महत्त्वाचं हे आहे की, भारताविषयी आशावाद व्यक्त करणारे ते एकटेच नव्हेत.गेल्याच आठवड्यात भारत-अमेरिका स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरम या संस्थेचे अध्यक्ष तसेच सिस्को या कंपनीचे मानद अध्यक्ष असलेल्या जॉन चेंबर्स यांनी 'भारत पुढील तीन-चार दशकांत चीनला ओलांडून जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थसत्ता बनेल, आणि या शतकाच्या शेवटी आर्थिकदृष्ट्या चीनच्या जवळजवळ दुप्पट झालेला असेल,' असं भाकित वर्तवलं. गेल्या आठवड्यात आलेल्या एस अँड पी ग्लोबल या जागतिक पतमापन संस्थेच्या अहवालात भारताचा चालू वर्षाचा वृद्धिदर ६.८ टक्के तर पुढील वर्षाचा वृद्धिदर वाढून ६.९ टक्के होईल, असे म्हटले आहे. काहीच दिवसांपूर्वी डेलॉइट या वित्तसंस्थेने भारताचे वर्णन 'जगाच्या निराशाजनक पार्श्वभूमीवर आशेचा किरण' असं करताना भारत सात टक्क्यांचा वृद्धिदर कायम ठेवू शकेल, असा विश्वास व्यक्त केला होता.सप्टेंबरच्या सुरुवातीला जागतिक बँकेने भारताच्या वृद्धिदराचे अंदाज आधीच्या ६.६ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर नेले होते. अशाच प्रकारे त्याआधी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि एशियन डेव्हलपमेंट बँक यांनी देखील भारताविषयीचे अंदाज वरच्या दिशेने बदलले होते. तर मूडीज या पतमापन संस्थेनेदेखील गेल्या महिन्यात भारताविषयीच्या अंदाजात वाढ केली.



'भारतीय अर्थव्यवस्थेने व्याजदर वाढलेले असताना आणि सरकार वित्तीय तूट कमी करत असताना देखील एप्रिल-जून २०२४ तिमाहीत ७.८ टक्क्यांचा वृद्धिदर गाठला. उद्योग तसेच सेवा या दोन्ही क्षेत्रांनी भरघोस कामगिरी दर्शवली. त्यातही सेवा क्षेत्रासाठी मागणी वेगाने वाढत आहे,' अशी टिप्पणी त्यांनी केली. अशा उदाहरणांची यादी खूप मोठी आहे.

माध्यमांतून सर्वसाधारणपणे गुन्हेगारी, अपघात, राजकीय साठेमारी, बंद, मोर्चे, तणाव अशा गोष्टी प्रामुख्याने बघणाऱ्या, वाचणाऱ्या सामान्यांना कदाचित हे सगळं काहीतरी वेगळं, क्षणभंगुर, अविश्वसनीय वाटू शकेल. परंतु एकीकडे स्थानिक पातळीवर शांतता आणि सुव्यवस्था किंवा रस्ते, पाणी, वीज, सार्वजनिक स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत सुविधांविषयी प्रश्न वाढत चाललेले असतानादेखील दुसरीकडे भारत शेतकी तसेच औद्योगिक उत्पादन, आंतरराष्ट्रीय व्यापार, रस्ते, रेल्वे, बंदरं किंवा विमानतळ यांसारख्या पायाभूत सुविधा, वाहतूक क्षेत्र, किंवा डिजिटल तंत्रज्ञानामार्फत पुरवता येणाऱ्या सेवासुविधा अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती करतो आहे, गुंतवणूक करतो आहे. त्याचा परिणाम म्हणजे १९९० च्या सुमारास असलेलं भारतीयांचं सरासरी ३०० डॉलरचं दरडोई उत्पन्न आजमितीला २७०० डॉलरवर जाऊन पोचलं आहे. आता होत असलेली प्रगती त्यात सातत्यानं भर घालत आहे, आणि त्यातून हळूहळू सर्वसामान्यांचं जीवनमान उंचावत आहे.आज ३.५ ट्रिलियन डॉलर असलेली भारताची जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था २०२७पर्यंत तिसऱ्या क्रमांकावर पोचेल आणि २०३० पर्यंत सात ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल, अशी अपेक्षा आज व्यक्त केली जात आहे. पुढील सहा-सात वर्षांत आणखी ३.५ ट्रिलियन डॉलर्स वाढवायचे म्हणजे दरवर्षी सरासरी ५०० - ५५० बिलियन डॉलरची वाढ होत राहिली पाहिजे. आत्ताच भारत दरवर्षी ४०० बिलियन डॉलरची वाढ करत आहे, त्यामुळे हे लक्ष्य अशक्य नाही.मोठ्या प्रमाणावर नवीन पायाभूत सुविधांची निर्मिती हा भारताच्या उन्नतीचा पाया ठरत आहे. भारताने गेल्या सात-आठ वर्षांत तब्बल एक ट्रिलियन डॉलर्स एवढी गुंतवणूक पायाभूत सुविधांमध्ये केली आहे आणि तेवढीच गुंतवणूक पुढील पाच- सहा वर्षांत करणार आहे. त्यामुळेच २०१४ साली अवघ्या पाच शहरांत २५०किमीमध्ये असलेली मेट्रो आता २१ शहरांमध्ये १००० किमी मार्गावरून धावते आहे, तर पुढील १,००० किमीचे मेट्रोमार्ग बनत आहेत. विमानतळांची संख्या ७४ वरून आता १५८ झाली आहे, तर २१ नवीन विमानतळ बनत आहेत, विद्युतीकरण केलेल्या रेल्वे लाइन्स २१,००० किमी वरून ६३,००० किमी झाल्या, हायवे दुप्पट झाले, देशातल्या ९९ टक्के खेड्यांपर्यंत पक्की सडक, वीज, सिलिंडर, मोबाईल नेटवर्क, इंटरनेट इत्यादी पोहोचले आहेत.

भारताने हरित ऊर्जेच्या उत्पादनातदेखील मोठी मजल मारली आहे. गेल्या १० वर्षात सौरऊर्जेची उत्पादन क्षमता २५ पट वाढली आहे, तर जैवऊर्जेचा वापर आठपट झाला आहे. सौरऊर्जेच्या उत्पादनात भारत आता जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे, तर त्यातील गुंतवणुकींसाठी भारत हा जगातील सर्वोत्तम देश गणला जात आहे.डिजिटल क्षेत्रातील भारताची क्रांती तर सर्वश्रुत आहेच. आज भारतात जगातील सर्वात स्वस्त, पण सर्वोत्तम मोबाइल इंटरनेट सेवा उपलब्ध आहे. भारत जगातील सर्वाधिक इंटरनेट वापरणारा देश बनला आहे. सरकारच्या पाठिंब्याने निर्माण झालेल्या डिजिटल सार्वजनिक सुविधा यांनी सरकारी सोयीसुविधांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला मदत केली असून त्याने संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे. त्यामुळेच भारत आज डिजिटल पेमेंटमध्ये जगात अव्वल ठरला आहे. आणि या सगळ्यांमुळे व्यापारउदिमाला चालना मिळालीच आहे, पण त्याचबरोबर प्रचंड प्रमाणावर स्टार्ट-अप्सना चालना मिळाली आहे. भारतातील स्टार्ट-अप्सची संख्या २०१४ मध्ये अवघी ४००-५०० होती ती आजमितीला १,४०,००० च्या वर गेली आहे, आणि 'युनिकॉर्न' च्या संख्येत भारत जगातील तिसरा देश बनला आहे.भारताची निर्यात वेगाने वाढते आहे आणि त्यामुळे व्यापारातील चालू खात्यातील तूट खूपच कमी झाली आहे. परकीय चलनाची गंगाजळी ओसंडून वाहते आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारात रुपया आपलं मूल्य टिकवून आहे. महागाई गेल्या पाच वर्षांतल्या नीचतम पातळीवर आहे. तर स्टेट बँकेने केलेल्या संशोधनानुसार देशांतर्गत आर्थिक विषमता देखील गेल्या आठ वर्षांत १५ टक्क्यांनी घटली आहे.

अशा पद्धतीनं सर्वांगीण विकासाच्या गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करताना भारताने अमेरिका, जपान, चीन आदी देशांप्रमाणे बेफिकीर आर्थिक धोरणे अंगिकारली नाहीत, हे विशेष आहे. पायाभूत सुविधांवर वाढती गुंतवणूक करताना वित्तीय तूट कमी कशी होत राहील, यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन प्रयत्नशील आहेत. पुढील वर्षी ही तूट देशाच्या अर्थव्यवस्थेच्या ४.५ टक्क्यांपर्यंत सीमित करून कर्जांचा बोजा कमी कसा होत राहील, त्याकडे सरकारचे लक्ष असेल. अशा धोरणांमुळेच भारताची भविष्यातील वेगवान वाटचाल निष्कंटक आणि अधिकाधिक खात्रीपूर्ण होत जाईल. त्यामुळे बाहेरील लोकांनी भारतात येऊन भविष्यातील विकाससंधींचा फायदा उचलण्याआधीच आपण भारतीयांनी जमेल त्या मार्गाने स्वतःला त्यासाठी सुदृढ, सुयोग्य बनवून सहभागी होणं ही काळाची गरज आहे.

# मतदारांनी मला मतदानरुपी आशीर्वाद देऊन आपली सेवा करण्याची संधी द्यावी-विलास भुमरे

**दैनिक एकनिष्ठा**
**संदीप शिंदे । पिंपरी राजा**

पिंपरी राजा येथे शिवसेना भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार विलास बापू भुमरे यांच्या प्रचारार्थ प्रचंड जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते या जाहीर सभेत विलास भुमरे यांनी मला प्रचंड मताधिक्याने निवडून देऊन आपली सेवा करण्याची संधी द्यावी असे आव्हान करून जनतेचे आशीर्वाद घेतला.

पैठण विधानसभा मतदारसंघात वडील संदिपान भुमरे यांनी केलेल्या चौफेर विकासामुळे मतदार संघातील प्रत्येक मतदार हा आमच्या कुटुंबातील सदस्य असल्या प्रमाणे त्यांच्या प्रत्येक सुखा दुखात सहभागी होण्याच्या आमच्या स्वभावा मुळे जनता मला भरघोस मताने निवडून देईल यात तीळ मात्र शंका नाही.

आमच्यात संस्कृती आणि संस्कार या दोन्ही गोष्टी असल्या मुळे आम्ही कुठल्याही धर्माबद्दल आकस बाळगला नसून सर्व धर्मसमभाव या भावनांनी मतदार संघात काम करत असून प्रत्येक सभे साठी जमलेला प्रचंड जनसमुदाय ही त्याची प्रचिती आहे.

गेल्या तीस वर्षापासून शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विधानसभेच्या पैठण मतदारसंघाच्या लढतीत बापू निश्चित विजयी होतील.

लोकसभेच्या छत्रपती संभाजीनगर मतदारसंघातून निवडून गेलेले संदीपान भुमरे यांनी १९९० पासून २००९ चा अपवाद वगळता पाच टर्म पैठणमधून विजय मिळवला.

संदीपान भुमरे यांना तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रोजगार हमी व फलोत्पादन खात्याचे कॅबिनेट मंत्री केले. अडीच वर्षानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सहभागी झाले. उद्धव ठाकरेंची सत्ता गेल्यानंतर महायुती सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांनी पुन्हा भुमरेंकडे आधीच्या खात्याचा पदभार दिला. शिवाय संभाजीनगरचे पालकमंत्री पदही दिले.

महाविकास आघाडी आणि महायुती अशा दोन्ही सरकारमध्ये मंत्री राहिलेल्या भुमरे यांना पैठण मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकास कामे खेचून आणली.

संभाजीनगर मधूनच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभेची उमेदवारी दिली. मराठवाड्यात महायुतीचे दिग्गज उमेदवार पराभूत होत असतांना भुमरे यांनी मात्र अनपेक्षितपणे विजय मिळवला. या विजयाने मराठवाड्यात आणि राज्यात शिवसेनेची पत वाढली.

विरोधकांनी आता गद्दार,खोके,दारू, हे विषय सोडून विकासावर बोलावे असे आव्हानही खासदार संदिपान भुमरे यांनी विरोधकाला केली.

संदीपान भुमरे यांनी तीस वर्ष राखलेला पैठण विधासभेचा बालेकिल्ला आता विलासबापू राखणार आहे. व्यासपीठावर मा जिल्हा परिषद उपाध्यक्ष अशोक जिजा पवार, जिल्हा परिषद सदस्य प्रकाश नाना चांगुलपाये, भाऊसाहेब तळमळे ,शैलेश चौधरी ,अमरजीत पवार, एकनाथ गवळी ,भाजपा तालुका उपाध्यक्ष विक्रम पाटील पवार, स्वामी ब्रह्मानंद वि अध्यक्ष दादासाहेब पाटील घोरपडे, रामेश्वर उकिरडे ,मंगेश पाटील पवार ,मनोज घनवट ,यांच्यासह अनेक मान्यवरांचे भाषणे झाली. सूत्रसंचालन अंकुश नरोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन मा सरपंच डॉक्टर प्रकाश बापू पवार यांनी मानले.या सभेसाठी पिंपरी राजा पंचक्रोशीतील आनेक गावचे सरपंच उपसरपंच विविध कार्यकारी सोसायटी सदस्य आजी-मजी पदाधिकारी यांची उपस्थिती होती.



# चंद्रपूर शहरात पैशाचा पाऊस २०० युनिट,नागरिकांचा उत्तम प्रतिसाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आज सकाळी चंद्रपूर शहरातील नागरिकांना एक अनोखा अनुभव आला, जेव्हा रस्त्यांवर दोनशे रुपयांच्या नकली नोटांचा पाऊस पडल्यासारखा वाटला. रस्त्यावर पसरलेल्या या नोटांवर २०० युनिट फ्री - विश्वास जुना, धोका पुन्हा असा मजकूर छापलेला होता. या नोटांच्या माध्यमातून चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार यांनी दिलेल्या खोट्या आश्वासनांचा पर्दाफाश करण्यात आला आहे.

किशोर जोरगेवार, जे मागील निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले होते, त्यांनी जनतेला २०० युनिट मोफत वीज देण्याचे मोठे आश्वासन दिले होते. मात्र, ते आश्वासन अद्यापही अपूर्ण राहिले आहे. आता ते भारतीय जनता पार्टीच्या तिकीटावर पुन्हा निवडणूक लढवत आहेत, परंतु त्यांच्या जुन्या वचनांचा विसर जनतेला पडलेला नाही. त्यांच्या खोट्या वचनांचा पर्दाफाश करण्यासाठी आम आदमी पार्टीने आज चंद्रपूरमध्ये ही जनजागृती मोहिम राबवली.




या कॅम्पेनमुळे शहरातील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षण निर्माण झाले. रस्त्यावर पडलेल्या नकली नोटा पाहून लोकांनी त्या उचलल्या आणि त्यावरील मजकुरामुळे त्यांना कॅम्पेनचा खरा संदेश समजला. अनेकांनी त्या नोटा आपल्या सोबत ठेवल्या, जणू त्या खोटच्या वचनांविरुद्धच्या लढाईचे प्रतीक होत्या.

या अनोख्या मोहिमेचा परिणाम म्हणून, नागरिकांमध्ये चर्चेची एक नवीन लाट उसळली आहे.

आम आदमी पार्टीच्या जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, आमदार किशोर जोरगेवार यांनी मागील निवडणुकीत मोठी आश्वासने दिली होती, परंतु ती अपूर्ण राहिली. खोट्या वचनांवर जनतेचा विश्वासघात करणाऱ्यांना आता घरी बसवण्याची वेळ आली आहे. मतदान हा एक पवित्र अधिकार आहे, आणि त्याचा अपमान करणाऱ्यांना नाकारले पाहिजे.या मोहिमेचा राजकीय परिणाम म्हणून, किशोर जोरगेवार यांना आगामी निवडणुकीत मोठ्या मतदानात नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यांच्या अपूर्ण वचनांमुळे निर्माण झालेल्या नाराजीमुळे मतदारांमध्ये मोठा असंतोष दिसून येत आहे. जानकारांच्या मते, जोरगेवार यांना यावेळी मतदारांचा विश्वास पुन्हा मिळवणे कठीण होईल. आम आदमी पार्टीच्या या मोहिमेने चंद्रपूरमधील निवडणूक प्रचारात एक नवीन वळण आणले आहे. या मोहिमेचा उद्देश जनतेला खोटच्या वचनांविषयी जागरूक करणे आणि योग्य नेत्यांना निवडण्यासाठी प्रोत्साहित करणे आहे. सामाजिक माध्यमांवरही या कॅम्पेनची मोठी चर्चा होत असून, नागरिकांकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात छत्रपती संभाजीनगरात घबाड सापडले

## १९ कोटींचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जळगाव रोडवरील स्थिर पथकाने गुरुवारी सायंकाळी एका वाहनाची तपासणी केली असता तब्बल १९ कोटी रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले. याशिवाय, निल्लोड येथील निवडणूक आयोगाला मिळालेल्या माहितीच्या आधारे कोट्यवधींचे दागिने सापडल्याची घटना उघड झाली आहे.

सदर दागिने जळगावमधील एका नामांकित ज्वेलर्सचे असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एवढ्या मोठ्या प्रमाणावर दागिने सापडल्यामुळे आचारसंहितेच्या उल्लंघनाचा संशय व्यक्त होत आहे.

सर्व दागिने सध्या जीएसटी विभागाच्या ताब्यात देण्यात आले असून, त्यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांची तसेच संबंधित कागदपत्रांची सखोल चौकशी सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार या प्रकरणाचा तपशीलवार अहवाल तयार केला जात आहे. घटनास्थळी स्थानिक पोलिसांसह निवडणूक आयोगाचे अधिकारी आणि जीएसटी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. याप्रकरणी पुढील तपास सुरू असून, या दागिन्यांच्या मालकासह



व्यवहारांमध्ये सहभागी असणाऱ्या अन्य व्यक्तींचीही चौकशी करण्यात येत आहे.

# उद्धव ठाकरे यांनी सभेला मार्गदर्शन केले




**राहुरी । प्रतिनिधी**

मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शंकरराव गडाख यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेला मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

महायुतीचे सरकार कसे बनले, हे सर्वांना माहिती आहे. हे खोक्याचे सरकार असून घटनाबाह्य पद्धतीने तयार झाले आहे. ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप पंतप्रधान मोदी यांनी ज्यांच्यावर केला, त्यांनी दुसऱ्याच दिवशी भाजपात प्रवेश केल्यानंतर तिजोरीच्या चाव्या त्यांच्याच हातात दिल्या जातात. सध्या मंत्रिमंडळ हे भ्रष्टाचाराचे केंद्र झाले आहे. कायदा-सुव्यवस्थेची वाताहत झाली असून, शेतकऱ्यांबाबत सरकारचे अजिबात लक्ष नाही; त्यांचे लक्ष फक्त मोठ्या उद्योजकांवर आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. ही परिस्थिती सुरळीत करण्यासाठी महाविकास आघाडीला सत्तेवर आणणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे शंकरराव गडाख यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करून महाविकास आघाडीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा, असे आवाहन त्यांनी जनतेला केले. यावेळी सभेत मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# सकाळी ८ वाजता वर्धा रोडवरील एस स्मार्ट दुकानाला आग,एमआरएफ टायरच्या दुकानालाही फटका



**वर्धा । प्रतिनिधी**

आज सकाळी ८ वाजताच्या सुमारास वर्धा रोडवरील एस स्मार्ट या दुकानाला भीषण आग लागली. या दुकानाच्या तळघरात एमआरएफ टायरचे दुकान असल्याने, आग दोन्ही दुकानांपर्यंत पसरली.

आग विझवण्यासाठी वर्धा, देवळी, पुलगाव येथून अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली असून, सकाळपासून पाण्याचा मारा सुरू आहे. आगीच्या घटनास्थळी माजी खासदार रामदास तडस आणि प्रसिद्ध बालरोगतज्ञ तसेच अपक्ष उमेदवार सचिन पावडे यांनी भेट दिली. अग्निशमन दलाने आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्तीचे प्रयत्न सुरू केले आहेत. आगीच्या नियंत्रणासाठी आसपासच्या दुकानांना रिकामे करण्यात आले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, या आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. तसेच, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. घटनास्थळी असलेल्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आणि अधिक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अग्निशमन दलाची कार्यवाही अद्याप सुरू असून, आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न चालू आहेत.

# कोपरगाव विधानसभा निवडणूक प्रचारानिमित्त ‘महाराष्ट्रवादी प्रचार सभा’

**कोपरगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार अशोक काळे यांच्या अध्यक्षतेखाली कोपरगाव येथे प्रचारसभा पार पडली. कोपरगाव मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक ती मदत करू, अशी ग्वाही अजित पवार यांनी यावेळी दिली. तसेच, पुढील काळात सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या सभेला महानंदाचे माजी चेअरमन राजेश परजणे, अशोक रोहमारे, राजेंद्र जाधव, जिल्हा सहकारी बँकेच्या माजी संचालिका चैताली काळे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, शिवसेना जिल्हाध्यक्ष नितीन औताडे, रविकाका बोरावके, पद्माकांत कुदळे, शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष धनंजय जाधव, पुणतांब्याचे सरपंच डॉ. धनंजय धनवटे, बाळासाहेब कदम, रिपाई (अ)चे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, भाजप




तालुकाध्यक्ष साहेबराव रोहोम, शहराध्यक्ष दत्ताजी काले, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब रहाणे, माजी नगरसेवक हाजी मेहमूदभाई सय्यद, रिपाईचे तालुकाध्यक्ष अनिल नन्नवरे, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मनेश गाडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव, शहराध्यक्ष सुनील गंगूले, तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, महिला तालुकाध्यक्षा अनिता खालकर, युवती तालुकाध्यक्षा वैशाली आभाळे यांसह राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, रिपाईचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऊस पेरणीकडे शेतकऱ्यांचा कल आहे

**विहामांडवा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात यंदा पावसाने हजेरी लावली सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने सिंचनासाठी पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे ऊस पेरणीकडे शेतकऱ्यांचा कल मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सध्या प्रत्येक गावातील शेतकरी रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीबरोबरच ऊस लागवडीत व्यस्त आहेत. यावर्षी जूनपासून जिल्ह्यात चांगला पाऊस सुरू झाला. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे नद्या, नाले, कालवे ओसंडून वाहत असल्याने मोठे, मध्यम व लघु प्रकल्प पाण्याने तुडुंब भरले. याशिवाय विहिरी, कूपनलिका यांच्या पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. रब्बी हंगाम आणि उसाच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आहे. त्यामुळे रब्बी पिकांसह उसाच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. वाढीचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. गतवर्षी पावसाअभावी बहुतांश शेतकऱ्यांनी उन्हाळी हंगामात ऊस तोडला, मात्र यंदा पाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांचा पुन्हा ऊस पेरणीकडे कल वाढला आहे. त्याचे चित्र प्रत्येक गावातील शेतात दिसते.एकरी सहा हजार रुपये भाव सध्या शेतकऱ्यांकडून विविध जातींच्या ऊसाची पेरणी सुरू आहे. यामध्ये शेतकरी, मजूर व्यस्त दिसत आहेत. ऊस पेरणीसाठी एकरी सहा हजार रुपये कंत्राटी पद्धतीने आकारले जात आहेत. महिलांना तीनशे रुपये तर पुरुषांना सहा रुपये मजुरी दिली जात आहे. तरीही नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उसाच्या पेरणीत शेतकरी व्यस्त आहेत.

# नितीन गडकरींचा काँग्रेसवर हल्लाबोल: अर्धा पगार तुम्ही, अर्धा आम्ही आणि गावोगावी रोजगार हमी

**अंबड । प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी जालन्यातील अंबड येथील प्रचार सभेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. पं. नेहरूंच्या पंतप्रधानपदाच्या काळापासून काँग्रेसने स्विकारलेली धोरणं देशाच्या विकासासाठी अपयशी ठरली असल्याचा आरोप गडकरींनी केला. आम्ही १० वर्षांत केलेलं काम काँग्रेस ६० वर्षांत करू शकली नाही, असं ते म्हणाले.गडकरींनी त्यावेळी काँग्रेसच्या धोरणांचा तपशील सांगितला, ज्या अंतर्गत स्टील उद्योग, सोन्याची आणि कोळशाची खाणी या क्षेत्रांमध्ये देशाचा पैसा गुंतवला गेला. तथापि, हे उद्योग फायदेशीर ठरले नाहीत. जर त्या काळात रस्ते, शेतकऱ्यांच्या सिंचन समस्यांवर उपाय, आणि ग्रामीण भागातील शाळा व दवाखाने उभे केले असते, तर आज देशाची परिस्थिती वेगळी असती, असं गडकरींनी स्पष्ट केलं.

घराणेशाहीवर हल्ला:गडकरींनी काँग्रेसवर घराणेशाहीचे आरोप केले. काँग्रेसने गरिबी हटावचा नारा दिला, पण त्या नाऱ्यातून कोणाची गरिबी हटली? असं प्रश्न विचारत, त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांसाठीच विविध शिक्षण संस्थांची व इतर संधींची व्यवस्था केल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांची, शेतमजुरांची गरिबी तरी काय कमी झाली? अशी टीका गडकरींनी केली.

काँग्रेसच्या शिक्षण धोरणावर टीका: गडकरींनी काँग्रेसच्या अर्धा पगार योजना आणि रोजगार हमी योजनेवरही निशाणा साधला. काँग्रेसने शाळांमध्ये 'अर्धा पगार तुम्ही, अर्धा आम्ही' असा धोरण स्वीकारला, असं ते म्हणाले.

देशभर रस्त्यांची कामे:गडकरींनी सरकारच्या रस्त्यांच्या कामांचा गौरव करत, आताच्या काळात जम्मू काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत रस्त्यांचे काम सुरू आहे. महाराष्ट्राला १२ हजार कोटी रुपये दिले आहेत, असं सांगितलं. पुणे ते छत्रपती संभाजी नगर रस्ता तयार होईल आणि नंतर तो नागपूरपर्यंत जाईल, ज्यामुळे ६ तासात नागपूरला पोहोचता येईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.जातिवादावर गडकरींचा स्पष्टपण:जातिवादावर भाष्य करत, गडकरींनी म्हटलं की, जात, पंथ आणि भाषा यामुळे माणूस मोठा होत नाही. माणूस त्याच्या गुणांनी मोठा होतो. त्यांनी उदाहरणे दिली, आपण एकनाथ महाराज, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची जात पाहतो का? गडकरींनी लोकसभा निवडणुकीत जातिवादावर तडजोड न करण्याचा स्पष्ट इशारा दिला.

# मतदानाच्या दिवशी मतदारांना सुखकर अनुभव मिळणाच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, जिल्हा निवडणूक अधिकारी श्री.भूषण गगराणी



**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकअंतर्गत बुधवार दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मतदान होणार आहे. लोकशाही प्रक्रियेत आपले बहुमूल्य मत नोंदवणाऱ्या मतदारांना मतदान केंद्राच्या ठिकाणी सुखद अनुभव येईल, याअनुषंगाने सर्व सुविधा सज्ज ठेवण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री. भूषण गगराणी यांनी संपूर्ण यंत्रणेला दिले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अतिशय सूक्ष्म आणि काटेकोरपणे नियोजन केल्याबद्दल त्यांनी संपूर्ण यंत्रणेचे कौतुक केले. मतदारांना मतदानाच्या दिवशी चांगला अनुभव यावा, मतदान केंद्राच्या ठिकाणी निश्चित किमान सुविधा, रांग व्यवस्थापन, प्रसाधनगृह व्यवस्था आदी सुविधांची पूर्ण अंमलबजावणी करण्याचे निर्देश श्री. गगराणी यांनी दिले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत बुधवार दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मतदानाच्या तयारीचा आढावा घेणारी बैठक भायखळा स्थित वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालय येथील पेंग्विन सभागृहात आज (दिनांक १४ नोव्हेंबर २०२४) आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. भूषण गगराणी हे अध्यक्षस्थानी होते. अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (मुंबई शहर) श्री. संजय यादव, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) श्री. राजेंद्र क्षीरसागर यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सर्व उपायुक्त, सर्व सहायक आयुक्त, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.मतदान केंद्रांच्या ठिकाणी रांगांचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रतीक्षा कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. याठिकाणी पंखा किंवा कुलर तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रत्येक ठिकाणी प्रसाधनगृहाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. ही प्रसाधनगृहे मतदानाच्या आधीच्या तसेच मतदानाच्या दिवशी स्वच्छ रहावीत यासाठी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने नेटके नियोजन करण्याचे निर्देशही यावेळी श्री. गगराणी यांनी दिले. मतदारांची गैरसोय होऊ नये यासाठी निश्चित किमान सुविधा उपलब्ध होतील, याची खातरजमा करण्याच्या सूचनाही त्यांनी यंत्रणेला दिल्या.दिव्यांग मित्र आणि दिव्यांग समन्वयक तसेच रांग व्यवस्थापनासाठी स्वयंसेवक म्हणून उपस्थित राहणाऱ्या राष्ट्रसेवा दल (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) यांचे मतदानाच्या दिवशी सहकार्य लाभणार आहे. या स्वयंसेवकांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यात यावे, असे आवाहन देखील श्री. गगराणी यांनी याप्रसंगी केले.अनेक मतदारसंघात गृहनिर्माण संस्थांच्या ठिकाणी मतदान केंद्रांची उपलब्धतता करून देण्याचा प्रयोग पहिल्यांदाच बृहमुंबई महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहे. मतदानाच्या दिवशी गृहनिर्माण संस्थांच्या परिसरात पोहचणाऱ्या मतदान केंद्रांचे पोहचरस्ते आणि प्रसाधनगृहांची उपलब्धतता याबाबतची खातरजमा करण्याच्या सूचनाही त्यांनी याप्रसंगी दिल्या.

## अनुराधा नागवडे यांच्या स्कॉर्पिओत दोन लाखांची रोकड जप्त,मुलासह तिघे ताब्यात

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**



श्रीगोंदा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या उमेदवार अनुराधा नागवडे यांच्या मालकीच्या स्कॉर्पिओ वाहनातून दोन लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात नागवडे यांचा मुलगा दिग्विजय नागवडे यांच्यासह तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

अहिल्यानगर शहरातील आयुर्वेद कॉर्नर येथे कोतवाली पोलीस ठाण्याच्या पथकाने नाकाबंदी दरम्यान कारवाई केली. नागवडे यांच्या मालकीच्या एम एच १२ यू वी २५२५ नंबर प्लेटच्या स्कॉर्पिओ वाहनाची तपासणी केली असता, वाहनात ५०,००० रुपयांपेक्षा जास्त रोकड सापडली.

ताब्यात घेतलेल्यांमध्ये दिग्विजय नागवडे (वय २०, रा. वाघंदरी, ता. श्रीगोंदा), विनेश शिर्के (वय २६, रा. बाबुर्डी, ता. श्रीगोंदा), ईश्वर मेहत्रे (वय २५, रा. आढळगाव, ता. श्रीगोंदा) आणि अविनाश इथापे (रा. श्रीगोंदा फॅक्टरी, ता. श्रीगोंदा) यांचा समावेश आहे.

तपासणीदरम्यान, शिर्के यांच्याकडे एक लाख रुपये, इथापे यांच्याकडे ५० हजार रुपये आणि मेहत्रे यांच्याकडे ५० हजार रुपये अशी एकूण दोन लाख रुपयांची रोकड आढळली. निवडणूक आचारसंहितेनुसार ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम जवळ बाळगण्यास मनाई आहे. मात्र, आरोपींकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने पोलिसांनी रोकड आणि वाहन जप्त केले. सदर रक्कम निवडणूक आयोगाच्या समितीकडे वर्ग करण्यात आली असून, पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या नेतृत्वाखाली पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे श्रीगोंदा विधानसभा निवडणुकीच्या वातावरणात खळबळ उडाली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीकडून जोरदार प्रचार सुरू असतानाच घडलेल्या या प्रकारामुळे नागवडे यांच्या प्रचार मोहिमेला धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट येथे बालक दिन उत्साहात साजरा

**हिंगणघाट | प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट द्वारा संचालित ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट येथे देशाचे पहिले प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाटचे मुख्याध्यापक अभय दांडेकर होते, तर अतिथी म्हणून प्रा. अजय बिरे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बालक दिनाच्या औचित्याने छोटे बालकांच्या हस्ते पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली.

प्रसंगी, प्रा. अजय बिरे यांनी पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. अध्यक्ष अभय दांडेकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना बालक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका विद्या येनोरकर यांनी केले, तर आभार शिक्षिका कल्याणी झिलपे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहकार्य केले.




## मतदान प्रक्रिया सुलभ आणि आनंददायी करण्याचे प्रयत्न व्हावेत- जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

:मतदान केंद्रावर गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि दिव्यांग मतदारांना रांगेत उभे राहावे लागू नये याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिल्या



जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर (दूरदृष्य प्रणालीद्वारे), महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, अपर जिल्हाधिकारी प्रविण महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील आणि दूरदृष्य प्रणालीद्वारे सर्व निवडणूक निर्णय अधिकारी तसेच समन्वयक अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, मतदान केंद्रांवर मतदारांना आनंदी आणि चांगले वातावरण मिळेल यादृष्टीने सुविधा करण्यात याव्यात. पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि मतदारांसाठी लागणाऱ्या अन्य सुविधा असतील याची मतदान केंद्रांना भेट देऊन खात्री करावी. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सायंकाळी मतदान केंद्रांना भेट देऊन प्रकाश व्यवस्थेचा आढावा घ्यावा. थंडीच्या पार्श्वभूमीवर मतदान कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा द्या, असे त्यांनी सांगितले.

## थोरात सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**



साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाल्यानंतर अनेक बैलगाड्या ते यांत्रिकी चाके कार्यान्वित होतात, आणि या सर्वांसाठी परमेश्वराचे आशीर्वाद आवश्यक असतात, असे प्रतिपादन आमदार बाळासाहेब थोरात यांनी केले. ते सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या ५८ व्या गळीत हंगामाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते.

आमदार थोरात म्हणाले, कारखान्याने ऊस उत्पादक, शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला असून संगमनेर तालुक्याच्या आर्थिक विकासात मोठे योगदान दिले आहे. यावर्षी चांगल्या पावसामुळे विक्रमी गाळप होईल आणि हे आर्थिक वर्ष शेतकऱ्यांसह सर्वांसाठी चांगले ठरेल. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श आणि शिस्तबद्ध व्यवस्थापनामुळे कारखान्याची वाटचाल यशस्वी झाली आहे.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी सहकार चळवळीच्या ग्रामीण विकासातील योगदानाचे कौतुक करताना सांगितले की, भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना देशातील सहकार क्षेत्रासाठी आदर्श राहिला आहे. कारखान्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ यांनी सांगितले की, हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्व विभागप्रमुख आणि कामगारांनी पूर्ण क्षमतेने काम करावे.

कार्यक्रमाला माजी आ. डॉ. सुधीर तांबे, कांचन थोरात, रणजीतसिंह देशमुख, डॉ. जयश्री थोरात, सुधाकर जोशी, व्हा. चेअरमन संतोष हासे, रामहरी कातोरे, नवनाथ आरगडे, राजेंद्र गुंजाळ, सुहास आहेर, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांसह विविध मान्यवर, संचालक मंडळाचे सदस्य, विभागप्रमुख आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले, सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले, तर व्हा. चेअरमन संतोष हासे यांनी आभार मानले.

### दुसऱ्या राष्ट्रीय फेंटबॉल स्पर्धेस उत्साहात सुरुवात

## फेंटबॉल देशाच्या कानकोपऱ्यात पोहोचविणार-खुशाल सिंग (राणा) ठाकूर

**जालना | असलम कुरेशी**

फेंटबॉल असोसिएशन ऑफ इंडिया, मध्यप्रदेश फेंटबॉल असोसिएशन व डॉ. झाकीर हुसेन एज्युकेशन कॅम्पस यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. झाकीर हुसेन कॉलेज मैदान, बुरहानपुर, मध्यप्रदेश या ठिकाणी दिनांक १५ ते १७ नोव्हेंबर २०२४ दरम्यान दुसऱ्या राष्ट्रीय फेंटबॉल स्पर्धा २०२३ - २४ आयोजित करण्यात आलेल्या आहेत, सदर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी खुशालसिंग ठाकूर बोलत होते, त्यांनी पुढे सांगीतले की, क्रीडा क्षेत्र केवळ असे एक मात्र क्षेत्र आहे ज्यामध्ये आजही खेळाडूची जात, धर्म, प्रांत असा भेदभाव केला जात नाही, तर केवळ त्या खेळाडूच्या गुणकौशल्ये यांच्या आधारावरच त्याला समर्थन दिले जाते, म्हणूनच क्रीडा क्षेत्रात योगदान देण्यासाठी आपण आपल्या संपूर्ण टीमच्या सहकार्याने फेंटबॉल हा खेळ देशाच्या कानकोपऱ्यात पसरविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी या वेळी जाहीर केले.




याप्रसंगी मंचावर डॉ. झाकीर हुसेन एज्युकेशन कॅम्पसच्या संचालिका डॉ. तस्लिमा सूरोरी, कॉलेजच्या प्राचार्या डॉ. निखत, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती प्रतिभा दीक्षित, फेंटबॉल इंडियाचे निरीक्षक शेख अहमद, संस्थापक सचिव शेख चाँद पी.जे., एम.के. पाठशाळाचे मुख्याध्यापक रुपेश रघुवंशी, राजस्थान फेंटबॉलचे सचिव राजेंद्र योगी यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर स्पर्धेला चार राज्यातून एकूण सोळा संघांनी सहभाग नोंदविला आहे, स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मध्यप्रदेश फेंटबॉल असोसिशनचे सचिव कमलेश सुरवाडे, नितीन धवसे, फेंटबॉल इंडियाचे सुरेश त्रिभुवन, शेख महेजबीन, संतोष वाघ, शेख समीर, सोहेल खान, शेख सरताज व आयोजन समितीचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत.

## राजेशभैय्या टोपे यांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद



**जालना | असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथे महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांचा प्रचार जोरात सुरु असून त्यांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. शनिवारी रांजणी येथील विविध प्रभागात महाविकास आघाडीचे उमेदवार राजेशभैय्या टोपे यांचा प्रचार करण्यात आला. या प्रचारात शेतकरी, सिंचन, आरोग्य, शिक्षण, सामाजिक आदी विविध क्षेत्रात राजेशभैय्या टोपे यांनी केलेल्या विविध विकास कामामुळे त्यांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077